चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र

कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

३१ ऑक्टोंबर, २०१७

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7276494810 (PRO)

## ❖ पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली विशेष मोहीमेतंर्गत अवैध दारूविक्रीच्या जिल्हयात एकुण २३ केसेस :-

महाराष्ट्र शासनाचे आदेशान्वये चंद्रपूर जिल्ह्यात दिनांक ०१/०४/२०१५ पासुन दारूबंदी घोषीत करण्यात आलेली असुन पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवुन **दिनांक ३०/१०/२०१७ चे ००:०१ ते २३:५९ वाजता पर्यंत जिल्ह्यात पोलीस स्टेशन रामनगर, बल्लारशाह, घुग्घुस, शेंगाव, माजरी, ब्रम्हपुरी, चिमुर, नागभिड, मुल, सावली, राजुरा, धाबा, विरूर, गडचांदुर, वरोरा** हद्दीत **एकुण २,७७,०३०/-रू** ची अवैध दारू जप्त करण्यात आली आहे. पोलीस स्टेशन ला एकुण **२३** गुन्हयाची नोंद करण्यात आली असुन **१५** आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

---

## ❖ रोडवर धोकादायक स्थितीत वाहने उभे करून वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहन धारकांवर कार्यवाही :-

**पोलीस स्टेशन बल्लारशाह:-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **बल्लारशाह** अंतर्गत ०५ आरोपी इसम हे आपआपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **बल्लारशाह** येथे अप.क्र. १०५२/२०१७, १०५३/२०१७, १०५४/२०१७, १०५५/२०१७ व १०५६/२०१७ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील ०५ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **बल्लारशाह** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन राजुरा :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **राजुरा** अंतर्गत ०२ आरोपी इसम हे आपआपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **राजुरा** येथे अप.क्र. ११५६/२०१७ व ११५७/२०१७ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले आहे. सदर गुन्हयातील ०२ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **राजुरा** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन ब्रम्हपुरी :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **ब्रम्हपुरी** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **ब्रम्हपुरी** येथे अप.क्र. १०४३/२०१७ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **ब्रम्हपुरी** पोलीस करीत आहे.

---

☎ : 07172-264300
📠: 07172-255800

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

✍: 7276494810 (PRO)

**पोलीस स्टेशन मुल :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **मुल** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **मुल** येथे अप.क्र. ९०५/२०१७ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **मुल** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन नागभिड :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **नागभिड** अंतर्गत ०१ आरोपी इसम हा आपले ताब्यातील वाहन रोडवर मानवी जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत उभे केल्याने पोलीस स्टेशन **नागभिड** येथे अप.क्र. ३९९/२०१७ कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आले असुन पुढील तपास **नागभिड** पोलीस करीत आहे.

---

❖ **मद्य प्राशन करून वाहन चालविणाऱ्या मद्यपी वाहन चालकांवर कार्यवाही :-**

**पोलीस स्टेशन राजुरा :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **राजुरा** अंतर्गत ०१ आरोपी इसम हे आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **राजुरा** येथे अप.क्र. ११५८/२०१७ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **राजुरा** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन शेंगाव :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **शेंगाव** अंतर्गत ०१ आरोपी इसम हे आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **शेंगाव** येथे अप.क्र. ५५७/२०१७ कलम १८४, १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **शेंगाव** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन सावली :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **सावली** अंतर्गत ०१ आरोपी इसम हे आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **सावली** येथे अप.क्र. ६८०/२०१७ कलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **सावली** पोलीस करीत आहे.

---

**पोलीस स्टेशन भद्रावती :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **भद्रावती** अंतर्गत ०१ आरोपी इसम हे आपले ताब्यातील वाहन दारू पिवुन दारूचे नशेत रोडवर धोकादायक स्थितीत भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवित असताना मिळुन आल्याने पोलीस स्टेशन **भद्रावती** येथे अप.क्र. १००५/२०१७ कलम २७९ भादंवि सहकलम १८५ मोवाका अन्वये गुन्हे नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील ०१ आरोपीस अटक करण्यात आली असून पुढील तपास **भद्रावती** पोलीस करीत आहे.

---

❖ **मुंबई जुगार कायदा अन्वये कार्यवाही :-**

**पोलीस स्टेशन पाथरी :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी पोलीस स्टेशन **पाथरी** अंतर्गत मौजा निमगांव येथे ०१ आरोपी इसम हा सार्वजनिक ठिकाणी सटट्‌ापटट्‌ी आकडयावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगाराचा खेळ खेळताना मिळुन आल्याने पो.स्टे. **पाथरी** येथे अप.क्र. २०५/२०१७ कलम १२ (अ) मुंबई जुगार कायदा अन्वये गुन्हयाची नोंद करण्यात आली आहे. सदर गुन्हयात घटनास्थळावरून जुगारच्या साहीत्यासह नगदी असा एकुण **४५५**/-रू चा माल हस्तगत करण्यात आला आहे. पुढील तपास **पाथरी** पोलीस करीत आहे.

---

❖ **प्रतिबंधक कारवाई :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी जिल्ह्यात कलम **१०७** दंड प्रक्रिया संहिता अन्वये ०७, कलम **११०** दंड प्रक्रिया संहिता अन्वये ०१, कलम ११० दंड प्रक्रिया संहिता अन्वये ०१ असे एकुण **०९** ईसमांवर प्रतिबंधक कारवाई करण्यात आली आहे.

---

❖ **मोटार वाहन कायदा अन्वये कारवाई :-**

दिनांक ३०/१०/२०१७ रोजी जिल्ह्याात मोटार वाहन कायदा अन्वये अवैध प्रवाशी ०१, रिफलेक्टर /नोपार्किंग ११, दारू प्राशन १८५ अन्वये ०१ व इतर केसेस **२११** असे एकुण **२२४** केसेस करण्यात आल्या आहेत.

---

## ❖A.T.M. नंबर व पासवर्डच्या सहाय्याने ऑनलाईन फ्रॉड करुन पैश्याची फसवणुक करणाऱ्या आरोपीला अटक करण्यास चंद्रपूर पोलीसांना यश :

दिनांक ०६ सप्टेंबर २०१७ रोजी रात्रो दरम्यान फिर्यादी सौ. त्रिरत्ना नारायण मेश्राम रा. नगीनाबाग चंद्रपूर हयांनी पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर येथे तक्रार नोंदविली कि, कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादीचे बॅंक ऑफ इंडिया येथील खात्याच्यझ एटीएम कार्डचे १६ अंकी नंबर व पासवर्ड वापरून फिर्यादीचे खात्यामधुन १५,९४५/-रु चे ऑनलाईन शॉपींग करून तिची फसवणुक केली आहे. यावरून पोलीस स्टेशन चंद्रपूर शहर येथे अपराध क्रमांक १४७३/२०१७ कलम ४२० भादंवि चा गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हा हा तांत्रिक स्वरुपाचा असल्याने गुन्हयाचा पुढील तपास सायबर सेल चंद्रपुर कडे सोपविण्यात आला.

श्रीमती नियति ठाकर, पोलीस अधीक्षक चंद्रपूर, आणि श्री. हेमराजसिंह राजपुत अपर पोलीस अधीक्षक चंद्रपूर यांचे मार्गदर्शनात पोउपनि श्री. विकास मुंढे व सायबर सेल चंद्रपूरचे पथकाने सदर प्रकरणातील फिर्यादीचे खात्यामधुन झालेल्या आर्थिक व्यवहाराचे तांत्रिक विश्लेषण करून प्राप्त पुराव्याच्या आधारे उत्तर प्रदेशातील मऊ जिल्हयातील अनुपार मठिया येथील काही नवयुवकांनी सदर अपराध केल्याचे निष्पन्न झाल्याने सायबर सेल येथील पथकाने उत्तर प्रदेश येथे जावुन त्या गुन्हेगारापैकी एका युवकास ताब्यात घेवुन सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. सदर आरोपी कडुन ३ मोबाईल, ९ सिम कार्ड आणि ४ मेमोरी कार्ड जप्त करण्यात आले आहे. आरोपीस गुन्हया संबंधाने विचारपुस केली असता त्यांने सांगीतले की, ज्यावेळी एखादा इसम एटीएम मधुन पैसे काढण्यासाठी उभे असतात त्यावेळी बरेच लोक एटीएम कार्ड हातात घेवुन उभे राहतात, तेव्हा आरोपी व त्याचे साथीदार हे एटीएम मध्ये उभे राहुन लोकांच्या हातात असलेल्या एटीएम कार्ड चे १६ अंकी नंबर, एक्सपायरी डेट, नांव इत्यादी पाहुन ते पाठ करून घेतात किंवा त्यांच्याकडील छोटया मोबाईलमध्ये नंबर डायल करुन घेतात व त्यानंतर सदर इसम एटीएम मध्ये पैसे काढण्याकरीता ०४ अंकी पासवर्ड पिन टाकत असतांना त्यांचे मागे राहुन पासवर्ड सुध्दा पाठ करून घेतात. सदर प्रक्रीयेला सायबरच्या भाषेत **"SHOULDER SURFING AND SKIMMING CRIME"** म्हणुन संबोधले जाते.

गुन्हेगाराकडुन एटीएम कार्डचा १६ अंकी नंबर, एक्सपायरी डेट, नांव, पासवर्ड ई. प्राप्त झाल्यावर ऑनलाईन पैशाची अफरातफर करणे सोयीचे होते. आणि याच पद्धतीचा वापर करून सदर गुन्हा केल्याचे आरोपीने प्राथमिक तपासात कबुली दिली आहे. सदर गुन्हयातील आरोपीने प्राथमिक तपासात त्याचे साथीदाराचे नाव सांगीतले आहे, सद्या आरोपी हा ०५ दिवसाच्या पोलीस कोठडी रिमांड मध्ये असुन गुन्हयाचा अधिक तपास सुरू आहे.

एकंदरीत सदर गुन्हयाचे प्राथमिक तपासात ही बाब प्रामुख्याने निर्दशनास येते की, सर्वसामान्य लोकांकडुन एटीएम चा वापर करतांना विविध बैंके कडुन निर्गमित सुचनांचे योग्य पालन न केल्यामुळे, एटीएम मध्ये अगोदर असलेल्या इसमांचे व्यवहार पुर्ण होण्याअगोदरच आंत जावून गर्दी करणे, एटीएम मध्ये निष्काळजीपणाने वापर केल्यामुळे, एटीएम मशीन मध्ये पासवर्ड टाकतांना किंवा कार्ड स्वाईप करते वेळेस आजु-बाजुस छुपा कॅमेरा किंवा एखादा इसमांची नजर असु शकते याचे भान न ठेवणे ईत्यादि प्रकारचा गुन्हेगारांकडुन अभ्यास होवून अशा प्रकारचे गुन्हे करतात.

तरी, याद्वारे सर्व नागरीकांना पुनश्च: आवाहन करण्यात येते की, बैंक व्यवहार/एटीएम व्यवहार/ ऑनलाईन शॉपींग/दुकानातील स्वाईप कार्ड शॉपींग करतांना काळजीपूर्वक आर्थिक व्यवहार करावा. तसेच फोनद्वारे कोणासही एटीएमचा १६ अंकी नंबर, सीवीवी नंबर आणि नंतर ओटीपी देण्यात येवू नये. तसेच एटीएम कार्डचे पासवर्ड पिन चेंज केले नसेल त्यांनी त्वरीत सदर पिन चेंज करावे. सर्वांनी त्यांच्या प्रत्येक ऑनलाईन अॅकाऊन्टचा पासवर्ड दर तिन महिण्याने नियमित चेंज करावेत. जेणे करुन आपल्या कडुन होणाऱ्या आंशीक चुकांचा गुन्हेगारांनी फायदा घेवू नये.